क्र.पोमसं/३३/७१२५/प्राधिकारपत्र रद्द/२६/२०१७ मुंबई,दिनांक :- ०६/१०/२०१७

**विषय :-** प्राधिकारपत्र रद्द करणेबाबत.

* * * * *

उपरोक्त विषयी बीडीएस प्रणालीवर प्राधिकारपत्रे रद्द करण्याबाबत आढावा घेतला असता सन २०१७-१८ या वित्तीय वर्षातील माहे एप्रिल पासूनची घटक कार्यालयांकडील प्राधिकारपत्रे रद्द करणे अद्याप बाकी आहे. याबाबत असे निदर्शनास आले आहे की, अधिदान व लेखा कार्यालय / कोषागार कार्यालयात देयके सादर करतांना ब-याचवेळा चुकीच्या रकमेच्या बीडीएस प्रिंट काढल्या जातात. तसेच, काहीवेळी कोषागारातून देयक परत आल्यामुळे बीडीएस रद्द करणे आवश्यक असते. परंतु, अशा बीडीएस रद्द न करता लेखा शाखेतील अधिकारी/कर्मचारी पुन्हा नवीन बीडीएस काढून देयकासोबत जोडतात. ज्यामुळे पुर्वी काढलेल्या बीडीएस वरील खर्च पडलेले अनुदान आहरण व संवितरण अधिका-यांच्या बीडीएस प्रणालीवर खर्च झाल्याचे दिसून येते. परंतु, प्रत्यक्षात सदर अनुदान खर्च झालेले नसते. याकडे कार्यालय प्रमुख /आहरण व संवितरण अधिका-यांनी जातीने लक्ष देण्याची आवश्यकता आहे.

२. यापुढे ज्या घटक कार्यालयांनी बीडीएस प्रणालीवरील आवश्यकता नसलेली प्राधिकारपत्रे रद्द केलेली नसल्याचे आढळून आल्यास त्यांची अतिरिक्त अनुदानाची मागणी मंजूर करण्यांत येणार नाही.

३. सर्व संबंधीत घटक प्रमुखांच्या कार्यालयाकडे दिनांक २७/०९/२०१७ पर्यंत किती प्राधिकारपत्रे रद्द करणे बाकी आहे, त्याबाबतची यादी सोबत पाठवित आहे. तेव्हा, सदर यादीतील प्राधिकारपत्रे रद्द करण्याबाबत (BDS Undo करणे) तात्काळ कार्यवाही करण्याच्या लेखा शाखेतील अधिकारी / कर्मचारी यांना सुचना द्याव्यात. तसेच, सदर यादी उदाहरण म्हणून सोबत जोडली आहे. त्यामुळे दिनांक २७/०९/२०१७ नंतरची सुध्दा आवश्यकता नसलेली प्राधिकारपत्रे वेळोवेळी रद्द करण्याची कार्यवाही तात्काळ करण्यांत यावी. सर्व प्राधिकारपत्रे रद्द झाल्याशिवाय या कार्यालयाकडे अतिरिक्त अनुदानाची मागणी करु नये. तसेच, या कार्यालयाकडून अनुदानाचे वाटप सुध्दा करण्यात येणार नाही, याची सर्व कार्यालय प्रमुखांनी नोंद घ्यावी.

(अनुप कुमार सिंह)
विशेष पोलीस महानिरीक्षक (प्रशासन)
पोलीस महासंचालक यांचेकरिता

प्रति,

संचालक, पोलीस बिनतारी संदेश, म. राज्य, पुणे
अपर पोलीस महासंचालक, गु. अ. वि., म.राज्य, पुणे
पोलीस आयुक्त ठाणे शहर/नवी मुंबई/पुणे शहर/सोलापूर शहर/नागपूर शहर/अमरावती शहर/ लोहमार्ग मुंबई

विशेष पोलीस महानिरीक्षक, रा. रा. पो. बल, पुणे
विशेष पोलीस महानिरीक्षक, मोटार परिवहन विभाग, म.राज्य, पुणे
पोलीस अधीक्षक, ठाणे ग्रामीण/पालघर/रायगड/रत्नागिरी/सिंधुदुर्ग/नाशिक ग्रा./अहमदनगर/धुळे/
जळगांव/नंदूरबार/पुणे ग्रा./कोल्हापूर/सोलापूर ग्रा./सातारा/सांगली/अकोला/परभणी/
औरंगाबाद ग्रामीण /अमरावती ग्रामीण /लातूर /भंडारा/ वाशिम/ गोंदिया/नागपूर ग्रा./
बीड/बुलडाणा/चंद्रपूर/गडचिरोली/हिंगोली/जालना/नांदेड/यवतमाळ/बिनतारी संदेश,पुणे
समादेशक, रा.रा.पो.बल, गट क्र. १, पुणे/२,पुणे/३,जालना/४,नागपूर/७,दौंड/८,मुंबई/ ९,अमरावती/
१०,सोलापूर/११,नवी मुंबई/१३,नागपूर/१६,कोल्हापूर
प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण विद्यालय,अकोला / बाभळगांव / जालना / मरोळ / नागपूर /
तुरची, सांगली /अपारंपारीक अभियान,नागपूर
कार्यासन अधिकारी, का.क्र. ३२